# .. kALa ..

## ॥ काळ ॥

कवी -गोविंदाग्रज- उर्फ राम गणेश गडकरी

रसग्रहणा प्रीत्यर्थ
लेखक- सूरिन् उसगांवकर

सुखान्तिका व शोकान्तिका, नाट्यशास्त्रातील दोन प्रमुख आविष्कार. सुखान्तिका मनाला सुखावून जाते, न्यायाचे राज्य असल्याचा पुनःविश्वास निर्माण करते. परंतु सुखान्तिका घडविताना लेखकाला या क्रूर जगाच्या वास्तवाशी प्रतारणा करावी लागते. कोठेतरी त्याचा अन्त मनाला नैसर्गिक वाटत नाही व त्यामुळे ती प्रेक्षकांच्या मनावर खोल ठसा उमटवत नाही. याउलट, शोकान्तिका हा सामाजिक प्रबोधन करण्याचा एक अत्यंत परिणामकारक असा प्रकार आहे. पण शोकान्तिका जर जबाबदारीने हाताळली नाही तर समाजाची दुःखाबद्दलची संवेदनशीलता हळू हळू कमी होईल-- हे तत्वज्ञान मांडले ते जगप्रसिद्घ ग्रीक तत्त्वज्ञानी ॲरिस्टोटल याने आपल्या “the tenth book of poetic” या ग्रंथात. जगाच्या पाठीवर शोकान्तिका या प्रकाराचा अत्यंत परिणामकारक असा प्रयोग केला तो William Shakespeare याने - त्यास तोड नाही.

मायमराठीत या प्रकाराची परिणामकता आजमावली ती मात्र राम गणेश गडकरी यांनी. आपल्या प्रत्येक नव्या ओळीतून शारदेच्या प्रतिभेचा आविष्कार घडवत मराठी साहित्याच्या सुवर्णकाळाचे निर्विवाद नेतेपण भूषविले ते ही त्यांनीच. मद्य व मद्यप्राशनाच्या समाजसंकेतात आज आमुलाग्र असा बदल झाला आहे, त्याचे अर्थ व संदर्भ संपूर्णपणे बदलले आहेत, तरी गडकऱ्यांचा -एकच प्याला- ही कलाकृती आजही अमर आहे. आजही अधोगतीला जाणाऱ्या कोणत्याही आयुष्याकडे जवळून पाहीले तर सिंधू, सुधाकर व तळिरामाच्या व्यक्तिरेखा प्रकट झाल्या शिवाय रहात नाहीत. हेच एका समृद्घ लिखाणाचे द्योतक.



From http://sanskritdocuments.org

-गोविंदाग्रज- या टोपणनावाने राम गणेश गडकरींनी काव्य लिहिले. माझ्या संग्रही असलेली त्यांची -काळ- ही रचना रसिकांसमोर मांडत आहे. १९०३ साली शब्दांकित झालेल्या या रचनेतला जिवंतपणा आज, १०० वर्षानंतरही, जाणवितो. ही रचना मानवी इतिहासाचा आढावा घेते, भविष्याची नांदी वाजविते की अथर्ववेदातील खालिल ऋचेला मानवंदना करते ते, रसिकहो, तुम्हीच ठरवा. शेवटी हिरा बघण्याची दिशा बदलली की नवीन पैलूचे दर्शन घडवणारच.

काले तपः काले ज्येष्ठं काले ब्रह्म समाहितम् ।
कालो ह सर्वस्येश्वरो यः पीताऽऽसीत् प्रजापतेः ॥
अथर्ववेद १९ , ५३ , ०८.

---

काळ
कवी -गोविंदाग्रज- उर्फ राम गणेश गडकरी

कोठें असे सकलपंडितमुख्य भोज?
कोठें शिकंदर जगद्विजयी सुराज?
कोठें स्वधर्मपरिपालक श्रीशिवाजी ?
कोठें तदीय यशवर्धक वीर बाजी? ॥१॥

ते राजकारणपटूत्तम धीट नाना
कोठें न कां दिसति ओढित कोण त्यांना?
लोकैकवीर रणधीर मुरारबाजी
कोठें लपोनि बसले कळते ना आजी? ॥२॥

कोठें मयसभा स्पृहणीयशोभा?
निस्तेज कां मज कथीं पृथुची यशोभा?
धारा कुठे सकळ लोक ललामभूता?
तें हस्तिनापुर कुठे हरि ज्यास त्राता? ॥३॥

गेले कुठें सुकवि जे प्रिय शारदेसी?
नेलें कोणीं अखिल भारतसंपदेसी?
गेलें कुठें बहुल वैभव पेशव्यांचें
व्यापार-कौशल कुठें लपलें चिंनाचे? ॥४॥


From http://sanskritdocuments.org

कां मृण्मया बनलि रोमकराजधानी?
कां ग्रीकराष्ट्रमहतीही न येत कानीं?
केलें कुणी परमदीन दमास्कसाते?
नेलें कुणी मिसरच्या सुयशोधनाते? ॥ ५ ॥

बाजीगजादी नवरत्नसुजातकोष,
प्राचीन वैभव नितान्त तसें अशेष;
स्तंभादि वीरजयसूचक वस्तुजात
केलें कुणी सकल हे स्मृतिमात्र ज्ञात? ॥ ६ ॥

स्थित्यंतरा करित कोण असा विदेही?
कीं नामरूप गुणवर्णन त्यास नाही?
छे; सर्व हें वितथ; नाम तयास आहे --
तो काळ जो करितसे स्थितिभेद बा हे ॥ ७ ॥

राम गणेश गडकरी, पुणें १९०३

---

Encoded, proofread, and comments by
Surin Usgaonkar" usgaonkar at hotmail.com

---

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated July 24, 2005



From http://sanskritdocuments.org